# Picture PostCard From Albania
## लेखक : विनय देसाई

अल्बेनियाच्या 'मदर तेरेसा' विमानतळावर उतरेपर्यन्त 'मदर तेरेसा' या देशाची होती याची काही खात्री नव्हती. आता पर्यंत 'मदर तेरेसा' म्हणजे 'कलकत्ता' हेच समिकरण डोक्यात बसलं होतं (आणि 'ओ कलकत्ता' नांवाच्या 'ब्रॉडवे शो' बद्दल ऐकल्यावर, या पाश्चात्यांचे कलकत्याबद्दलचे विचार म्हणजे 'शिव शिव शिव राम राम राम' हे ही लक्षात आलं होतं). अल्बेनियाची एकंदरीत परिस्थिती बघितल्यानंतर मदरने हा देश सोडून कलकत्याला राहणे का पसंत केलं हे लक्षात येतं. बाकी या देशाचा भारताची सबंध एवढ्या एका व्यक्तीत संपवता येईल. युरोपात कुठेही गेलं तरी पंजाबी गुजराथ्यानी उघडलेलं एखादं तरी 'करी हाऊस' नक्की सापडतं. पण अल्बेनियात अजून मसाल्याचा वास पोचलेला नाही. उद्योग धंद्याच्या निमित्त जगभर कुठेही राहणाऱ्या आणि धंदा करणाऱ्या अमराठी भारतीय माणसाला इथे उतरावंसं वाटलं नाही यावरूनही या देशाच्या एकंदरीत परीस्थितीची कल्पना यावी.

राजधानी 'तिराना'ला जवळ असलेला 'रिनास' एअरपोर्ट हा आपल्या गोव्याचा एअरपोर्ट एवढाच असावा. इथल्या सोई पण काही वेगळ्या असल्या तर गोव्यापेक्षाही कमीच असतील. बहुक इथे येणारी विमानं म्हणजे 'टर्बो प्रॉप' प्रकारची, म्हणजे बाहेर दोन मोठे पंखे असलेली. या प्रकारची विमानं अजून वापरली जातात यावर माझा विश्वास नव्हता. 'केल्याने देशाटन' ज्ञानात भर पडते ती अशी.

गम्मत म्हणजे इथे येताना आमच्यापैकी प्रत्येकाला विमानाचा काही वेगळाच अनुभव आला होता. मी आलो त्या विमानाने एकदा 'रन-वे मिस' केला आणि साधारण दहा फुटाच्या अंतरावर असताना पायलटची ट्युब पेटली आणि त्याने उतरता उतरता पुन्हा 'टेकऑफ' घेतला. माझ्या अजून एका सहकाऱ्याचं विमान धावपट्टीच्या आधीच चार सहा फुट उतरलं आणि मग कसंतरी धडपडत धावपट्टीवर पोहोचलं. अजून एका विमानाचं पुढचं चाक उतरताना उघडलचं नाही आणि हे वेळीच लक्षात आल्यावर परत 'टेकऑफ लंडिंग'चे सोपस्कार करावे लागले. तोपर्यंत आत बसलेल्या पासिंजरांचे जीव टांगणीला लागलेले असतात हे ओघानेच आलं. तेव्हा इथे तळावर उतरताना 'अल्लावर' सहज विश्वास बसावा अशी आपोआपच व्यवस्था केली जाते असं म्हणायला हरकत नाही ('अल्ला' भक्तानी आपल्या अस्तित्वाची जाणीव देण्यासाठी दिवसातून पाच वेळा 'बांगेची' सोय केली आहे). हल्ली कुणीही नवीन आलं की 'आज तू कशातून वाचलास?' हा प्रश्न सगळे विचारतात. एकामेकांची चौकशी करायची सवय लागते ती अशी. परवा मी याच विषयावर बोलत असताना एका मित्राने 'अरे टर्बो-प्रॉप हवेत बंद पडलं तरी जास्त वेळ तरंगत राहतं' अशी माहिती पुरवून, 'जीव टांगणीला लावण्याची सोय त्यात असते' अशी पुस्ती जोडली.

विमानतळ तसा अगदी सर्वसाधारण आहे. एक धावपट्टी आणि तीन चार विमानं एकावेळी दाटीवाटीने उभी राहू शकतील एवढी जागा. पहिल्यांदा आलो होतो तेव्हा तर विमानापासून टर्मिनल पर्यन्त नेणाऱ्या बसेस पाहून 'कुडाळ-निवती' बसची आठवण झाली. टपावर ठेवलेल्या टोपल्यांमधून गळणारे माशाचे पाणी (निवतीला), बऱ्याचच्या शिटा फटलेल्या, काही शिटा कोणाला तरी एस.टी. लागल्यामुळे निकामी झालेल्या. असं असूनही आपली मासे वाहणारी एस.टी. बस देखील किती स्वच्छ असते असं वाटू लगलं. जनावरं भरण्यासाठी वापरायची गाडी असं या बसचं वर्णन करता येईल. सीटचे तुकडे फडून त्यातल्या स्पंज पळवलेला बघून आपल्या जुन्या सिनेमा थेटरांची आठवण होते. सीटमधला स्पंज फाडून नेण्यात लोकाना नक्की काय आनंद मिळतो हे मला आता कुणा अल्बेनियन माणसाला विचारायला हवं. आता मात्र नवीन

बसेस घेतलेल्या दिसतात. प्रवाशांकडून जमा केलेल्या दहा यूरोचा काही तरी उपयोग केला जातोय म्हणजे इथे आलेले कंसल्टंट्स मुम्बई एअरपोर्टच्या सेवेतून आलेले नसावेत.

तळावर काही 'अल्बेनिअन एअरलाईन'ची विमानं उभी असतात. पण ती गेली सहा महीने तिथेच उभी आहेत तेव्हा ती ही 'अॅटमॉसफेर क्रिएट' करायला ठेवली असवीत हे लक्षात येतं. गेल्या खेपेला मी या एअरलाईनने प्रवास करण्याचं धाडस केलं होतं (तसा मी धाडसी आहे) पण ते विमान बल्गोरियाच्या 'हुमास कंपनी' कडून भाड्यावर घेतलेलं होतं हे ऐकून यात मी आनंद मानावा की नाही हेच कळेना. त्या विमानाच्या मध्यावरून शेपटी पर्यंत एक धुणी वाळत घालायच्या दोरी सारखं काहीतरी बांधलेलं पाहून माझे हातपाय गळाले होते हे आता सांगत नाही. अल्बेनियात धुणी वाळत घालायची प्रथा असली तरी विमानावर काय वाळवत असतील हे माझ्या लक्षात येईना. हा प्रकार शेपटीला आधार देण्यासाठी होता की विमानाला याचा विचार करत मी विमानात बसलो. यापुर्वी रशियन विमानाच्या मॅकॅनिकने 'प्लॅस्टिक टॅग' वापरून विमानाचा पंखा दुरूस्त केल्याचं मी 'सिक्स्टी मिनिट' या कार्यक्रमात पाहिलं होतं. तेव्हा पासून जर्मनी पलिकडील एकाही युरोपीय देशाच्या एअरलाईनचा वापर करायचा नाही असा संकल्पही केला होता. पण माझं नांव 'पितामह भीष्म' नसल्यामुळे मोडावा लागला. हा प्रकार म्हणजे 'रेडीयो अँटिना' होती हे नंतर कळलं.

व्हिसाची रांग फार नसली तरी 'परदेशी' नागरिकांसाठी एकच रांग उघडून अल्बेनियाने बचत केली होती. त्यातही कामापुरतं इंग्रजी न जाणणारा अधिकारी ठेऊन न बोलता व्हिसा घेण्याची सोयही केली होती. व्हिसाचे दहा यूरो घेणारा अधिकारी मात्र तत्पर होता. व्हिसा, इमिग्रेशनची कागदपत्रं पूर्ण करून मी सामानाच्या रांगेत उभा राहिलो. रांग असली तरी रांगेचे नियम न पाळणे हा इथल्या लोकांचा स्वभाव दिसतो. 'इटली' मधेही मला हा अनुभव आला होता, त्यामुळे मीही निर्ढावलो होतो आणि मुळचे भारतीय रक्त असल्यामुळे या प्रकाराची सवयही होती. सामान ताब्यात घेतल्यानंतर सगळं सामान एक्स-रे मशीनमध्ये टाकून तपासणी करण्यासाठी वेगळी लाईन होती. एकीकडे सामान तपासणीसाठी टाकून मी 'मेटल-डिटेक्टर' मधून पलिकडे बाहेर पडलो. माझं सामानही सुखरूपपणे बाहेर पडलं. 'एक्स-रे मशीन' वर तपासणी करणारा कारकून अगर पोलीस कुठे चहा प्यायला गायब झाला होता कोण जाणे? सामान 'एक्स-रे' मध्ये टाकण्याची जबाबदारी पार पडली जात होती, पुढे त्यात काय आहे हे 'अल्ला'वर सोडून देण्यात आलं होतं. अतिरेक्यांच्या या जमान्यात 'अल्लाचिया सेवका वक्र पाहे' असा कुणी भूमंडळी नसल्यामुळे त्याना चिंता नसावी.'मेटल-डिटेक्टर'च्या शेजारी उभा असलेला पोलीसही 'निष्काम कर्मयोगी' असल्याचं पाहून मलाही समाधान वाटलं.

बाहेर टॅक्सीवाल्यांनी पुन्हा 'इंदिरा गांधी' हवाई अड्याची आठवण करून दिली. 'साहेब टॅक्सी', 'साहेब टॅक्सी' करत लहान लहान मुलं मागे लागत होती. परदेशी प्रवाश्यांचे सामान खेचून घेण्यात टॅक्सीवाल्यांची झटापट चालली होती. कसलेतरी अगम्य भाषेतले 'बॅच' दाखवून आपली टॅक्सी ही अधिकृत आहे हे पटवण्याचा प्रयत्न चालला होता. रांग लावायची पध्दत नाही हे मला आधीच कळलं होतं तेव्हा रांगेत उभं राहून टॅक्सी घेण्याचा प्रश्न नव्हता. टॅक्सीला सर्वसाधारणपणे वीस डॉलर लागतात याची आगामी कल्पना असल्याने मी घासाघीस करून तो भाव पक्का केला आणि मग गाडीत बसलो.

परीस्थितीने गरीब असलेया या देशात टॅक्सी मात्र सगळ्या मर्सिडीज. या लोकाना मर्सिडीजचं वेड असावं. कारण रस्त्यावर जाताना नव्वद टक्के गाड्या मर्सिडीज दिसत होत्या. फक्त गाड्यांची कंडीशन विचारात नाही घेतली तर बरी. बहुतेक गाड्या तीस चाळीस वर्षं जुन्या. त्यामुळेच की काय हे बेंझचे वेड वाढले असावे (इथे या गाड्याना बेंझ म्हणूनच ओळखतात). या गाड्या पन्नास वर्षं देखील टिकतात अशी

माझ्या ज्ञानात भर पडली (म्हणजे 'बापभी वापरेगा, बच्चाभी वापरेगा'). अजून एका स्थानिक तरुणीशी चर्चा करता यातल्या बहुतेक गाड्या जर्मनी आणि आसपासच्या देशातून चोरून आणलेल्या असतात अशीही मौलिक माहिती मिळाली. 'इटाली' प्रमाणे इथेही माफियाचे राज्य असून बेंझ गाड्या आणि त्यांचे सुटे पार्ट पुरवण्याचे घाऊक कंत्राट माफियाकडे आहे असं माझ्या टॅक्सीवाल्याचं म्हणणं पडलं.

रिनास पासून तिराना कडे जाणारा या देशातला एकमेव हायवे हा विमानतळापासून आठ दहा किलोमीटरवर सूरू होतो. तोपर्यन्त एका छोट्या रस्त्याने जावं लागतं. या रस्त्याकडे पाहिल्यावर बेंझची गरज पटते. तुरळक असणाऱ्या बस आणि ट्रकच्या रहदारीला शह देत या गाड्या सुसाट सुटतात. रस्त्याच्या दुतर्फा अगदी तुरळक पण श्रीमंत लोकांची घरं असावी हे पाहताच लक्षात येतं. आजूबाजूची माणसं फाटकी असली की बंगल्याला फाटक आपोआप येतं.

घरांची बांधणी मात्र एकाद्या गरीब देशाच्या नियमांप्रमाणे होत असणार हे उघड आहे. गरीब देशांमध्ये आधी घर बांधलं जातं. मग रस्त्यापासून घरापर्यंत पाऊलवाट निघते. मग घर बांधणाऱ्याकडे मोटारगाडी असेल तर रस्ता केला जातो. पाश्चात्य देशात याचा उलटा प्रकार असतो. तिथे आधी रस्ता आणि इतर प्लॅनिंग आणि मग घर बांधणे असा क्रम असतो.

'हाय-वे'ला लागल्या नंतर दुतर्फा 'बॉम्ब शेल्टर' दिसतात. पहिल्या भेटीला मला ही बांधकामं पाहून जरा आश्चर्य वाटलं होतं तेव्हा तिथल्या एका माणसाने ती कुठल्यातरी युध्दाची देणगी आहे हे मला सांगितलं होतं. आता मात्र बहुतेक ठिकाणी नव-नवीन इमारती उद्या राहत असल्यामुळे ही 'बॉम्ब शेल्टर' हळू हळू दृष्टीआड होत आहेत. आता परदेशी पर्यटकांसाठी तयार केलेले 'बॉम्ब शेल्टर'च्या आकाराचे 'ॲश-ट्रे' मिळतात.

जवळपास अर्ध्या तासाने मी तिराना शहरात पोहोचलो. रस्त्यावर जेताना बऱ्याच ठिकाणी पोलीस तपासणी चालली होती. ठिकठिकाणी पोलिसानी गाड्या अडवलेल्या दिसत होत्या. पण ही तपासणी म्हणजे नुसती चौकशी असावी. १९९३ साली कम्युनिस्टांपासून स्वतन्त्र झालेल्या या देशात फारसे रस्ते नाहीत. फारश्या गाड्या पण नव्हत्या आणि त्यामुळे ट्रॅफिकचे नियमही नाहीत. बहुतेक चालकांकडे 'लायसेन' असेल की नाही याची मला शंका आहे. अपूरे रस्ते आणि भरपूर (बेंझ) गाड्या त्यामुळे शहरात 'ट्रॅफिक ज्याम' हा नेहमीच असतो. त्यात पुर्ण शहरात मिळून आठ दहा सिग्नल असावेत. अर्थात हे सिग्नल बऱ्याचदा बंद असतात आणि चालू असले तरी नियम पाळून गाडी चालवणे इथल्या संस्कृतीत बसत नसावं. मग सिग्नल असो वा नसो, चार रस्ते एकत्र आले की तिथे पोलीसांची नेमणूक असते. अजून या पोलीसांनी मुंबईला ट्रेनिन्ग घेतलं नसावं. मुंबईचा पोलीस हा सिग्नल सोडून पुढे पंधरा वीस कदमावर लपून बसतो. ॲक्सिडेण झाला तरी त्याला पर्वा नसते. फक्त सिग्नल तोडून कुणी आला की लगेच 'अरे चोरा, बरा सापडलास, आता कापतो तुला' अशी त्याची पॉलीसी असते. इथे नियम तोडून घुसणाऱ्या डायव्हरला पोलीस शिव्या देताना मी पाहिला आहे पण त्यातून खिसे भरायची कल्पना त्याना आली नसावी. किंवा मग 'ट्रॅफिकचे नियम' नसल्यामुळे 'आमाला पावर नाय' हे पण कारण असेल.

मी आता तिराना शहरात स्थिरावलो आहे. मी काम करतो ती 'बँक शिप्रीस' या देशाची रिसर्व बँक आहे. या बँकेची इमारत ही पहिल्या महायुध्दाअगोदर बांधली असावी. त्या नंतर त्यात फारश्या सुधारणा करणं या लोकाना नामंजूर असावं. बँकेची इतकी गचाळ इमारत मी यापूर्वी फक्त हंगेरीत पाहिली होती ( त्याबद्दल पुन्हा केव्हातरी). आम्ही काम करतो त्या खोलीला 'एयर कंडीशनर'ची सोय असली तरी इतर खोल्यांमध्ये ती ही सोय नाही. 'स्वच्छतागृह' तर उत्तर भारतातून जश्याच्या तसं इम्पोर्ट केलेलं असावं. तिथे कधी पाणी असतं, कधी नाही. टॉयलेट आहे सीट नाही, दरवाज्याला कडी आहे पण ती नीट लागत नाही.

मध्ये मध्ये कसल्यातरी छापील सूचना लावलेल्या असतात पण त्याही फक्त अगम्य भाषेत. बहुधा 'आज पाणी येणार नाही' असं लिहीत असावेत. 'वापरू नका, त्याने जिवास धोका आहे' अशी सूचना असली तरी वाचता आली तर उपयोग. एकंदरीत तुम्ही जीवावर उदार होऊन तिथे जाणारच असाल तर जा बापडे अशी अवस्था. त्यामुळे नैसर्गिक व्यवहार हॉटेल वर असताना पूर्ण करणे आणि घाई लागली असल्यास परत हॉटेलवर जाणे अशा काही सवयी आपोआप लागतात. एकदा तर आम्ही बसतो त्या लायब्ररी बाहेर, जिन्यावर बदाबदा पाणी गळू लागलं. चौकशी अंती ते वरच्या कुठल्याश्या मजल्यावर 'फॉल्ट' आहे असं उत्तर मिळालं. त्या पाण्याच्या उगामाची धास्ती घेतल्याने आम्ही आमची चौकशी आवरती घेतली.

तिराना शहरात पहाण्यासारखं काहीही नाही असं खुद्द इथे रहणाऱ्या लोकांचं मत आहे. अगदी तुम्हाला राहवत नसेल तर चाळीस मजली ऊंच 'स्काय-टॉवर' वर जा म्हणजे तिराना दिसेल अशी एक सूचना आली. इथे 'अल्बेनियन' अशी कोणती गोष्ट मिळेल या प्रश्नाला देखील 'काहीही नाही' हेच उत्तर मिळालं. त्यामुळे रस्त्यावर खाली मान घालून चालणं हा एकमेव पर्याय उरतो. म्हणजे इकडे तिकडे बघणं मला आवडत नाही असं नव्हे. पण रस्त्यावरचे खड्डे आणि उघडे टाकलेले 'मॅनहोल' चुकवून चालताना समोर बघून चालणं शक्य होत नाही. काही ठिकाणी भर रस्त्यावर एवढे मोठे खड्डे आहेत की 'स्मार्ट' सारखी एखादी गाडी पूर्णपणे आत जाऊ शकेल (युरोपात बेंझ आणि स्वाच या दोन कंपन्यानी एकत्र येऊन स्मार्ट नावाची छोटीशी गाडी काढली आहे). दुकान साफ करून घाण झालेल्या पाण्याच्या बादल्या रस्त्यावर ओतणारे दुकानदार आणि रस्त्यावर नोटा विकणाऱ्यांपासून सावध राहिलं की झालं. मुम्बईला जसे पावभाजीच्या गाड्या चौपाटीवर दिसतात तशा प्रमाणात इथे पैसे बदलून देणारी माणसं नाक्या नाक्यावर उभी असतात. पहिले काही दिवस मी हा सगळा प्रकार बघून चक्रावलो होतो. पण हा सगळा प्रकार बँकेच्या दारातच चालतो आणि पोलीसही शांतपणे बघत उभे असतात तेव्हा त्यात बेकायदेशीर काही नसावं.

अल्बेनियन माणसांची संख्या जगभर मिळून साठ लाख आहे असं म्हणतात. त्यातले तीस लाख म्हणजे निम्मे लोक हे देशाच्या बाहेर, म्हणजेच युरोप, अमेरिकेत आहेत. अजून बरेचसे मॅसाडोनिया या शेजारी राष्ट्रात रहात असून तिथे त्यांची स्थानिक लोकांशी बरीच मारामारी चालू आहे. उरलेल्या तीस लाख लोकांमधले पंधरा लाख लोक हे एकट्या तिराना शहरात राहतात. बाहेर राहणाऱ्या तीस लाख लोकसंख्येकडून इथे राहणाऱ्या लोकाना सतत पैशाचा ओघ असतो. हा सगळा पैसा हा बहुतेकवेळा काळा पैसा म्हणूनच देशात येतो, त्यामुळे इथे श्रीमंत माणसं बरीच असली तरी सरकारला टॅक्स रूपाने फारच कमी पैसा मिळतो. त्यामुळेच की काय रस्त्यावर बहुटेक बेंझ या जुन्या, खटारा असल्या तरी बऱ्याच नवीन आणि कोऱ्या पण असतात.

युरोपात मध्यभागी आणि छोटा देश असल्याने आतापर्यंत इतर बऱ्याच देशानी वाऱ्या करून या देशाला गुलामगिरीत ठेवलं होती ही पण माहिती मिळते. त्यात पश्चिमेला इटली, दक्षिणेला ग्रीस आणि त्यापूर्वीही 'हूण' आणि 'तुर्की' लोकांच्या स्वाऱ्या या देशावर झालेल्या आहेत. त्यात 'मेडिटरेनियन' समुद्रापलिकडील इटालीचा यांच्यावर खूपच प्रभाव अजूनही आहे. खाण्यापिण्यात पिझ्झा, पास्टा सर्वत्र मिळतो आणि त्याव्यतिरिक्त फारसं काही मिळत नसावं. समुद्र जवळ असल्याने 'मत्स्यप्रेमी' मंडळीना पण चंगळ करता येईल एवढे मासे मिळतात. पण रस्त्याकाठच्या या छोट्या पिझ्झेवाल्यानी 'इटालीयन' खाण्याच्या नक्कली बरोबर शिस्तही 'इटली'कडून घेतली असावी. असाच एकदा मी एका खाद्यगृहामध्ये पिझ्झा मागवला. मला अल्बेनियन आणि वेटरला त्याव्यतिरिक्त कोणतीच भाषा येत नसल्याने मी त्यातल्या त्यात मागवायला सोपा म्हणून 'व्हेज पिझ्झा' मागवला. काही वेळाने माझ्या समोर आलेल्या पिझ्झामधल्या 'सलामी'ने मला

सलाम मारला. वेटरचं लक्ष वेधून घेईपर्यन्त तो माझा पिझ्झा दुसऱ्या कुणालातरी टेकवून आला होता. मी ही चूक त्याच्या लक्षात आणून देईपर्यन्त (माझं अल्बेनियन काय वर्णावं) त्या दुसऱ्या गिऱ्हाईकाने माझ्या 'वेज पिझ्झा'चा एक लचका तोडला होता. वेटरने माझी तक्रार शांतपणे ऐकून घेतली आणि 'सलामी' पिझ्झा आणि वेजी पिझ्झाची लगेच अदलाबदल केली. आता 'उष्टा' पिझ्झा मला नको हे त्याला समजावणं भाग होतं. उष्टा म्हणजे नक्की काय हा प्रकाश त्याच्या डोक्यात पडणं अशक्य होतं ( उष्टं म्हणजे काय हे पाश्चात्य लोकांना का कळत नाही कोण जाणे? अमेरिकन टी.व्ही.वर कोणतीही सिरियल बघा; किचनमध्ये शिजत्या भांड्यातला चमचा तोंडात घालून लोक चव बघतात. आपल्या आज्या स्वयंपाक पूर्ण होऊन देवाला नैवेद्य ठेवेपर्यंत तिकडे पाऊलही ठेवू देत नसत). तो लचका तोडलेला पिझ्झा, हाच मी मागवलेला पिझ्झा आहे असं त्याचं म्हणणं असावं. आणि जरी मी तो पिझ्झा मागवलेला असला तरी मला उष्टा पिझ्झा नको आहे हे त्याला पटवायला मी ॲक्टिंगची पराकाष्ठा केली. शेवटी मी उठून चालायला लागलो आणि त्याची ट्युब पेटली.

'ह्या भाडx.x.xला नवीन पिझ्झा हवा असणार' असं काहीतरी बडबडत तो आत गेला आणि मी

'बसा, साहेब. तुमच्या साठी नवीन पिझ्झा आणतो,' असं तो म्हणाला असावा अशी मनाची समजूत करून घेतली.

त्या नंतर त्या किंवा तत्सम कुठल्याही खाद्यगृहात न जाण्याचं मी स्वत:शी ठरवून टाकलं.

पर्यटनाला काही विशेष नसलं तरी 'वीक-एण्ड' घालवायला काहीतरी शोधण्याला पर्याय नव्हता. सोबत दोन रोमेनियन पण होते, तेव्हा एखादं अल्बेनियन धाडस करायचं ठरलं. त्यातल्या त्यात तीस किलोमीटरवर असलेल्या 'डेयटी'च्या पॅनोरमा पॉईंट'वर आम्ही जावं अशी एक सूचना आली. तिथे नक्की काय बघता येईल या प्रश्नाला मात्र 'तिथून तिराना स्वच्छ दिसतं' हे उत्तर मिळालं. तेव्हा कॅमेरे वगैरे तयारी घेऊन आम्ही 'डेयटी'(DejTi)कडे प्रयाण करायचे ठरवले. टॅक्सीवाल्याला खाणाखुणाकरून भाव पक्का केला आणि या डेयटीची वाट धरली. अर्धवट बांधलेली कच्ची घरं, मोकाट कुत्री, डोंगरावरून खाली वाहणारं पाणी बघत आमची ट्रीप निघाली. काही लोक डोंगरावरून येणारं पाणी मिनरल वॉटरच्या बाटल्यांमध्ये भरून घेत होते. हे पाणी कुठल्या कुठल्या ठिकाणी विकलं जातं हे विचारायचा धीर होईना. त्याठिकाणी जमलेलं हिरवागार शेवाळ तोंड उघडू देईलतर शप्पथ. पण ज्याअर्थी नेणारे लोक हे पाणी छोट्या छोट्या गाड्यांमधून नेतात त्याअर्थी ते घरगुती वापरासाठी असावं असं मनाचं समाधान करून घेतलं.

टॅक्सीचालकाला इंग्रजी येत नसल्यामुळे मोडक्या तोडक्या इटालियन मध्ये माहिती मिळत होती. बहुतेक इमारतींकडे बोट दाखवून ही कम्युनिस्टानी लुटली हेच तो सांगत होता. पुढे प्रश्न विचारता येत नव्हते. रस्ता मात्र आपल्याकडच्या एखाद्या घाटासारखा होता. सभोवती भरपूर बर्फ साचलं होतं. गाड्यांची चाकं घसरत होती. आम्हाला पाठवणाऱ्यानी स्वतः इथे यायचे कष्ट का घेतले नव्हते हे तेव्हा लक्षात आलं. समोरासमोरून गाड्या आल्या की एकामेकांवर आपटणार की काय असं वाटत होतं. तरी काही बेंझवाल्यांचा उत्साह आणि वेग कमी होत नव्हता. समोर दुसरी गाडी दिसली मी माझे पाय काल्पनिक ब्रेक लावत होते. शेवटी डायवर साहेबानी 'साहेब घाबरू नका, जीव गेला तर मी ब्रेक न लावल्यामुळे जाईल, तुम्ही उगाच पायानी जोर देऊन माझी बेंझ तोडू नका' असं काहीतरी म्हटलं आणि मी माझा जीव डायवरच्या मुठीत ठेऊन बसलो.

जाताना रस्त्यावर बऱ्याच ठिकाणी कसले तरी प्राणी सळयांवर भाजण्याचं काम चालू होतं. चौकशी करता त्या मेंढ्या आहेत असं कळलं. मला तर ते कुत्र्यासारखे दिसत होते पण इथे कुत्रे खाल्ले जात नाहीत (त्यासाठी व्हिएटनामला जावं लागतं) ही माहिती आणि शेतामध्ये चरणाऱ्या मेंढ्या बघून मी पण

त्या मेंढ्याच असाव्यात असा विचार पक्का केला. मेंढी पण जीवानिशी जाताना वातड लागते का? हा प्रश्न मला 'इटालियन- अल्बेनियन' येत नसल्यामुळे अनुत्तरित राहिला. बरोबरचे रोमेनियन मागे बसून त्यांच्या भाषेमध्ये 'रँव रँव' करत होते त्यामुळे त्यांनाही विचारता आलं नाही. 'शेळी जाते' ही म्हण त्यांच्या भाषेत नसावी.

जागोजागी लहानमोठी 'रेस्टॉरंट' दिसत होती. बहुतेक सगळी आपल्या चहा भज्यांच्या 'हॉटेलांपेक्षा' मोठी नव्हती. रविवार असल्यामुळे गिऱ्हाईकांच्या स्वागताची तयारी चालली होती.

तीस किलोमीटरचं हे अंतर पार करायला आम्हाला चांगला दिड तास लागला. चालक मात्र कसली कसली माहिती देत होता. वरती जातानाच त्याने वाटेत आमच्या साठी खाण्या-पिण्याचं 'बुकिंग' करून टाकलं. 'कमिशन आहे वाटतं' ही माझी कुजकट शंका मी मनातल्या मनात दाबून टाकली. वरती पोह्रोचल्यावर आम्ही तिराना शहराचे दर्शन घेतलं. तिथे काहीही बघण्या सारखं नाही हे माहित असून सुध्दा 'आम्ही तिथे जाऊन आलो' हे समाधान होतंच. टी.व्ही. टॉवरशिवाय तिथं अजून काहीच नव्हतं. पाच दहा मिनिटं वेळ काढून आम्ही 'रेस्टॉरंट' गाठलं. 'पॅनोरमा व्ह्यू' बघत बघत जेवण आटपलं. तिथेच बर्फात एकामेकांवर बर्फाचे गोळे टाकणाऱ्या पोरांबरोबर दोन मिनिटं त्यांचा खेळही खेळून घेतला. बर्फात हात घालायची तयारी नसल्यामुळे त्याना नेमबाजीचं शिक्षण एवढाच माझा सहभाग होता. परतीची वाट समोरचा उघडा घाट, समोरून येणाऱ्या भरधाव गाड्या, आणि आजूबाजूला पसरलेला बर्फ पहाण्यात गेला. पुन्हा कधीतरी वेळ मिळाला तर त्याच डायव्हरला बोलवण्याचं आश्वासन देऊन आम्ही टॅक्सी सोडली.

अल्बेनिया आता सुधारतो आहे. सध्याच्या अतिरेकी महापौरानी नियम करून सगळ्या इमारतीना बाहेरून रंग फासण्याचा फतवा काढला आहे. स्थानिक लोक त्याना अतिरेकी समजतात पण त्यामुळे शहराला वेग-वेगळे रंग फासलेले दिसतात. एकाद्या ऊंच इमारतीवरून खाली पाहिलं तर रंगबिरंगी इमारतींचा ताटवा दिसतो (इमारतीला पिवळा अगर गुलाबी रंग लावणाऱ्या माणसाने नक्की कुठली दारू चढवली असेल हे मात्र लक्षात येईना). रस्त्यावर सिगरेट विकणाऱ्या आणि भीक मागणाऱ्यांमध्ये बरीच लहान लहान मुलं असली तरी आपल्या युरोपीयन शेजाऱ्यांच्या मदतीने तो प्रगती करू पाहतो आहे. इराक युध्दात अमेरिकेची बाजू घेऊन त्याने अमेरिकेशी मैत्री केली आहेच (माननीय विदुषकरावांना कुणाचाही पाठिंबा चालला असता). त्याचाच परीणाम म्हणून की काय इथलं 'इंफ्रास्ट्रक्चर' सुधारण्यात अमेरिकन कंपन्या आणि अमेरिकन पैसा आघाडीवर आहे. लवकरच या देशाला युरोपीयन संघात सामील व्हायचं आहे. त्यासाठी त्यानी जय्यत तयरी चालवली आहे. कम्युनिस्ट विचारसरणीची पाठ सोडून लोकशाहीची वाट धरून सुधरू पाहणाऱ्या इतर पूर्व-युरोपीयन देशांशी त्याची स्पर्धा चालू आहे.

मी केलेल्या प्रत्येक वारीत तिथे होणारे बदल जाणवता आहेत. रस्ते सुधरायला अजून वेळ असला तरी बाकी बऱ्याच यंत्रणा सुधरू लागल्या आहेत. दिवसातून सात आठ वेळा लाईट जातात पण तरी दोन तीन मिनिटात परत येतात. माणसं नियम पाळत नसली तरी ट्रॅफिकचे दिवे धोक्याचा ठिकाणी लावले जात आहेत. मी जे काम करतो आहे ते बँकेचे कामही या सुधारणेचाच भाग आहे. तेव्हा येत्या काही वर्षात ह्या देशाचा कायापालट होईल यात मला शंका नाही.

भल्या पहाटे निघणाऱ्या विमानाने मला आता बाहेर पडायचे आहे. विमान म्हटल्यावर मला पुन्हा विमानाचे किस्से आठवत आहेत. एकही शब्द न समजणारा टॅक्सीचालक आठवतोय. पण इथून निघून घरी जाता येणार याचाही आनंद आहे. एअरपोर्टवर मला काहीच्या काही 'एक्झीट टॅक्स' लावून लुटणारा गेल्या खेपेचा कस्टम ऑफिसर अजून लक्षात आहे. त्यासाठी बरोबर 'चेंज'ची व्यवस्था करून मी निघतो, आणि

’बाय -बाय’ अल्बेनिया करून, देवाचं नांव घेत विमानात पाय टाकतो.

मागच्या खेपेला उतरताना विमानाच्या एका पंखावर दोनदा वीज पडून तो जवळ जवळ निकामी झाल्याची आठवण आत्ताच का बरं यावी ?